# चौथी परीक्षा प्रश्नपत्रिका २०२१

उमेदवाराचे नाव ______________________ वय __________

परीक्षा केंद्र ______________________________________

परीक्षा संचालकाचे नाव ______________________ सही __________

तारीख ______________________________

लेखी परीक्षा गुणदान

| प्रश्न | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | एकूण गुण | अंतिम गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राप्त गुण | | | | | | | | | | |
| पैकी गुण | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | ८० | ४० |

तोंडी परीक्षा गुणदान

| | प्रार्थना श्लोक | कविता व अर्थ | छोटी/ इतर माहिती | सामान्य ज्ञान माहिती | वाचन प्रश्नोत्तरे | श्रवण प्रश्नोत्तरे | अंतिम गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राप्त गुण | | | | | | | |
| पैकी गुण | ५ | १० | ५ | १० | १५ | १५ | ६० |

| एकूण अंतिम गुण | /१०० |
|---|---|

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

**प्रश्न १ अ) खालील उतारा वाचा आणि पूर्ण वाक्यात उत्तरे लिहा. गुण ६**

दर उन्हाळ्यात जोशी कुटुंब उत्तर अमेरिकेहून भारतात, आजोळी जायचे. इतक्या लांबच्या प्रवासाची तयारी म्हणजे, आधी विमानाची तिकिटे काढणे. प्रत्येक तिकिटाची किंमत $१२००.
आणि अंतर तरी केवढे? उत्तर अमेरिकेतून युरोपपर्यंत २५०० मैल. तिथे उतरून विमान बदलावे लागे. युरोपहून भारत जवळपास ७५००मैल. एवढा लांबचा प्रवास केवळ हवाईमार्गामुळेच ३६ तासात शक्य होता.

१. जोशी कुटुंबात पाच व्यक्ती आहेत. त्यांच्या तिकिटाचे एकूण किती डॉलर होतील? १ गुण

उत्तर: ______

______

२. उत्तर अमेरिकेपासून भारतापर्यंतचा प्रवास किती दिवसात पूर्ण होतो? १ गुण

उत्तर: ______

______

______

३. उत्तर अमेरिकेहून भारतापर्यंत जाऊन -येऊन एकूण किती मैलाचा प्रवास होतो ? २ गुण

उत्तर: ______

______

४. हवाईमार्गाचा एक फायदा व एक तोटा लिहा. २ गुण

उत्तर: ______

______

______

______

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

**प्रश्न १ ब) खाली दिलेले चारही अंक वापरून कोणत्याही दोन, ४-अंकी संख्या बनवा.**

तुम्ही बनवलेली ४-अंकी संख्या खालील रकान्यामधे, अंकात आणि शब्दात लिहा. गुण ४

(४, ७, २, ८)

| संख्या | अंकात | शब्दात |
|---|---|---|
| १. | ___ ___ ___ ___ | ____________________ |
| २. | ___ ___ ___ ___ | ____________________ |

**प्रश्न २अ) खालील वाक्ये वाचून कंसातील योग्य उत्तराभोवती गोल ⬭ करा.** गुण ५

१. सूर्याशिवाय पृथ्वीवरची जीवसृष्टी __________ होईल.

( समृद्ध, नष्ट, सुरक्षित )

२. शहरातील वाहतुकीचा प्रश्न सोडवण्याकरता __________ यांचा वापर वाढत आहे .

( आरमारी जहाजे, भुयारी आगगाड्या, बैलगाड्या )

३. समर्थ रामदासांनी __________ लिहिला.

( दासबोध ग्रंथ, पसायदान , महाभारत )

४. पृथ्वीवरच्या पाऊस पाण्याच्या चक्राला__________ म्हणतात. ( भुईचक्र, जलचक्र , दिनचक्र )

५. मंगळ, गुरू, बुध हे सूर्यमालेतील__________ आहेत . ( गृह, ग्रह, गऱ्ह)


© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

**प्रश्न २ ब) खालील वाक्ये वाचून बरोबर किंवा चूक अशी खूण करा.** **गुण ५**

१. गोकुळाष्टमीला गुढी उभारतात.____

२.जलमार्ग हा वाहतुकीचा सर्वांत जलद प्रकार  आहे.____

३.भात, आमटी, भाजी व पोळी हे मराठी जेवणातील मुख्य प्रकार नाहीत.____

४. समर्थ रामदास सज्जनगडावर राहात.____

५.बोटीवरून उडी मारून सावरकर मार्सेलीसपर्यंत पोहत गेले .____

**प्रश्न ३अ) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.** **गुण२.५**

| | |
|---|---|
| आठव  X | पुष्कळ X |
| संशय X | कोरडे  X |
| जबाबदार  X | |

**प्रश्न ३ब) खाली दिलेला प्रत्येक शब्द फक्त एकदा वापरून ५-जोडशब्द बनवा.** **गुण२.५**

(समोरा, वाद, लहान, <u>आपट</u>, लाले, अधून, मोठे, मधून, समोर, विवाद, लाल, दर, भाजी, <u>आदळ</u> )

| | |
|---|---|
| उदाहरण -  <u>आदळआपट</u> | ३. |
| १. | ४. |
| २. | ५. |

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America. 

**प्रश्न ३क) योग्य उद्गारवाचक शब्द वापरून गाळलेल्या जागा भरा.** **गुण२.५**

( छे, शाब्बास, बापरे, अरेरे, वाहवा )

| | |
|---|---|
| १)________ थोडक्यात बस चुकली! | ४) ________ ! काय उत्कृष्ट तबला वाजवला. |
| २) ________तू शर्यत जिंकलास ! | ५) ________ मी नाही भाषण देणार! |
| ३) ________ काय हा खोटारडेपणा! | |

**प्रश्न ३ड) खालील क्रियापदांचा काळ ओळखा आणि योग्य रकान्यात ✔ अशी खूण करा.**

**गुण२.५**

| क्रियापदे | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ |
|---|---|---|---|
| उदाहरण- पळाला | | ✔ | |
| १. आदळली | | | |
| २. बसशील | | | |
| ३. ओळखते | | | |
| ४. बघता | | | |
| ५. विनवते | | | |
| ६. वाचले | | | |
| ७. समजावले | | | |
| ८. धरतील | | | |
| ९. निघते | | | |
| १०. वापरेल | | | |

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

**प्रश्न ४अ) खालील संवाद वाचून विचारलेल्या प्रश्नांची पूर्ण वाक्यात उत्तरे लिहा. गुण ५**

**रोहित:** आपल्या बागेतल्या झाडावरची नाजूक पिवळी फुले पाहिली का? खिडकीतून बघ,झाड सबंध भरून गेलंय. काटेसुद्धा दिसत नाहीयेत.

**आई:** अरे हो ! काही दिवसांपासून मी त्या झाडावर एक वेगळीच गंमत बघतेय. एक सुगरण पक्षी घरटे बांधतोय. चार अर्धवट घरटी बांधून झालीयेत त्याची आणि आता फांदीवर बसून रोज गाणी म्हणतोय.

**मुग्धा:** पण माहितीये का? जर सुगरण पक्षिणीला त्यातले एखादे घर आवडले तरच त्यांचे कुटुंब तयार होईल. त्याने अर्धवट बांधलेले घर मग ती पूर्ण करेल.

**आजी:** घरट्याच्या खालच्या बाजूला एक लांब बोगदा असतो. सुगरण पक्ष्याला आतबाहेर करता येईल इतकाच तो मोठा असतो. बोगद्यातून वर गेल्यावर दोन किंवा जास्त कप्पे असतात. त्या कप्प्यांत सुगरण पक्षीण पांढरीशुभ्र अंडी घालते.

**मुग्धा:** केवळ चोच आणि पंजा वापरून सुगरण पक्षी सुबक घरटी विणतात. म्हणूनच ह्या पक्ष्यांना इंग्रजीमधे विवर बर्डस असे नाव आहे.

**आई:** सुगरण पक्षी किती कुशलतेने आणि कष्टाने घरटी बांधतात. आपली बाळे सुखरूप राहावी, त्यांची नीट वाढ व्हावी या भावनेचे प्राणी जगातले हे उत्तम उदाहरण आहे.

१.हा संवाद कुठे घडला असेल? १ गुण

___

___

२. उतारा कशाबद्दल आहे? २-३ वाक्यात लिहा. २ गुण

___

___

३.विणणे हा शब्द वापरून स्वत:चे वाक्य बनवा आणि लिहा. १ गुण

___

___

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

४. सुगरण पक्ष्याबद्दल उताऱ्यातून कोणती माहिती मिळते? कोणताही एक मुद्दा लिहा. १ गुण

**प्रश्न ४ब) खालील वाक्ये पूर्ण करा.** **गुण ५**

१.जर नदीला पूर आला तर

२.आम्ही जेव्हा सहलीला जातो तेव्हा

३.सिंहगड चढताना खूप कष्ट झाले परंतु

४.आपल्याला कोणी रागावू नये म्हणून

५.आकाशातील तारे बघायला काहीजणांना आवडतात कारण

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

प्रश्न ५अ) खाली  दिलेले चित्र पाहा व पाच ते सहा वाक्यात वृत्तपत्र बातमी लिहा.        गुण ५



April 30, 2021, Circus Comes to Town, Toronto

-----------------------------------------------


© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

प्रश्न ५ब) खालील चित्राचे ५ ते ६ वाक्यात वर्णन करा. गुण ५




© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

**प्रश्न ६) खाली दिलेले शब्दगट वापरून त्या संदर्भात (context) प्रत्येकी दोन वाक्ये बनवा.**

**गुण१०**

१. मसाले, मराठी जेवण २. उत्तरायण, तिळगूळ ३. हवा, प्रदूषण

४. भारत, राजधानी ५. कोकण, नकाशा

उदा – भारत, श्रीलंका: भारताच्या दक्षिणेला श्रीलंका हा देश आहे. श्रीलंकेची राजधानी कोलंबो आहे.

१.

२.

३.

४.

५.

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

प्रश्न ७ अ) खालील शब्दाचे लिंग ओळखा व चूक ✗ की बरोबर ✓ ते लिहा. गुण२.५

| | |
|---|---|
| नदी– स्त्रीलिंगी: ✓ | बाजरी– स्त्रीलिंगी: |
| पर्वत – स्त्रीलिंगी: | वाळवंट – पुल्लिंगी: |
| सौरउर्जा – पुल्लिंगी: | सण – नपुंसकलिंगी: |

प्रश्न ७ ब) खाली दिलेल्या <u>शब्दसमुहात न बसणारा</u> शब्द बाजूला लिहा. गुण २.५

उदाहरण ---

| | | |
|---|---|---|
| गोड पदार्थ | जिलबी, श्रीखंड, खीर, पावभाजी | पावभाजी |
| | | |
| निसर्ग | धबधबा,सागर,ओहोळ,विहीर | |
| शाकाहारी पदार्थ | भाजी,कोंबडी वडे,आमरस,बर्फी | |
| वीज | चमकते, ओरडते, कोसळते, लखलखते | |
| संत रचना | उखाणे,अभंग,ओवी, भजन, | |
| भावना | आनंद, दु:ख,भीती,आजार | |

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

**प्रश्न ७ क) खालील वाक्ये वाचून कंसातील योग्य वचनाभोवती गोल ( ) करा. गुण२.५**

१.पंढरपूरला विठोबाच्या दर्शनासाठी ___________ गर्दी होते.
(भक्तांची / भक्ताची)

२.कडाक्याच्या थंडीत भल्या पहाटे ___________ नकोशी वाटे.

(अंघोळी/अंघोळ)

३.चांगला पाऊस झाल्याने शेतात भरपूर ___________आले.

(पिके/ पीक)

४.ताजमहाल जगातील सात ___________ एक मानले जाते.

(आश्चर्यांपैकी/ आश्चर्यापैकी)

५.काही लोकांना अनेक ___________ असतात. (छंदे/छंद)

**प्रश्न ७ ड) खालील वाक्यांतील क्रियाविशेषणांभोवती गोल करा . गुण२.५**

उदाहरण: मी दादाच्या घरी (**लवकर**) पोहोचेन.

१.आजोबांना कॉफी फारशी आवडत नव्हती.

२. रात्रंदिवस मुसळधार पाऊस पडत होता.

३.ट्रॅफिक कासवापेक्षाही हळू सरकत होता.

४.रांगोळीत रंग झटपट भरा.

५. पालेभाजी स्वच्छ धुऊन घे.

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

**प्रश्न ८अ) खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा.** **गुण ५**

The Earth and Moon rotate around the Sun. A solar eclipse happens when the Moon is between the Earth and the Sun. If the Earth is between the Sun and the Moon, then its shadow falls on the Moon. This is called the lunar eclipse. People used to fear eclipses in the past.

**प्रश्न ८ ब) खालील उताऱ्याचे इंग्रजीत भाषांतर करा.** **गुण ५**

मला फळ्यावरची अक्षरे नीट वाचता येत नव्हती म्हणून माझे बाबा मला ऑप्टोमेट्रीस्टकडे घेऊन गेले. त्यांनी माझे डोळे तपासले आणि मला चष्मा लागेल म्हणून सांगितले. त्यांच्याकडे पुष्कळ फ्रेम्स होत्या. माझ्या चष्म्यासाठी मी एक जांभळी फ्रेम निवडली. माझ्या मित्रांना हे मी कधी सांगेन असे मला झाले होते!

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.